Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.मं./परीक्षा–७/६४१
पुणे – ४११००४
दिनांक ०८/०२/२०२३

प्रति
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :– इ. १० वी व १२ वी ची प्रमाणपत्र संबंधितांना तातडीने उपलब्ध करुन देणेबाबत.
संदर्भ :– १ ॲड. सलीम शेख यांचे पत्र क्र. F.1/HAJ/23, दिनांक १७/०१/२०२३.
२ या कार्यालयाचे पत्र क्र. रा.मं/परीक्षा–७/१६३० दिनांक १२/०२/२०२०.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, इ. १०वी/१२वी ची प्रमाणपत्रे बऱ्याच माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडे प्रलंबित आहेत. सदर प्रमाणपत्रे जन्मदिनांकाच्या पुराव्यासाठी पासपोर्ट व अन्य ठिकाणी ग्राहय धरले जाते. नागरीकांनी मागणी केल्यानंतर ते संबंधितांना तातडीने उपलब्ध होऊ शकत नाही, विशेषत: हज यात्रेकरु किंवा इतर नागरिकांना ते वेळेत न मिळाल्याने त्यांना अडचणी येत असल्याबाबत या कार्यालयास तक्रार प्राप्त झाली आहे.

याप्रमाणे पुढीलप्रमाणे सूचना सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना देण्यात याव्यात:–

१ शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी विद्यार्थी इ.१०वी व इ.१२वी परीक्षा उत्तीर्ण झालेनंतर निकालानंतर उत्तीर्ण विद्यार्थ्यांना साधरणत: सहा महिन्यानंतर उत्तीर्णता प्रमाणपत्र दिले जाते. याबाबत विद्यार्थ्यांना आवेदनपत्र भरतेवेळी व परीक्षेचे गुणपत्रक देते वेळी नोटीसबोर्डवर अवगत करुन देणे.
२ प्रत्येक वर्षी विभागीय मंडळामार्फत माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रमाणपत्र वितरीत झाल्यानंतर त्यांनी संबंधित विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र घेऊन जाण्यासाठी तातडीने सूचित करावे.
३ प्रमाणपत्रे वेळेत वितरीत होतील याकडे कटाक्षाने पहावे.
४ प्रमाणपत्र वितरणाचा अहवाल विभागीय मंडळात सादर करावा.
५ मागील प्रलंबित प्रमाणपत्रे संबंधितांना घेऊन जाण्याबाबत सूचित करावे. संबंधितांनी मागणी केल्यानंतर ती तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी.
६ द्वितीय प्रमाणपत्राची मागणी आल्यास संबंधितांना योग्य ते सहकार्य करण्यात यावे.

या संदर्भात विभागीय मंडळांनी दर वर्षी माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडून त्यांचे कडील वितरीत झालेल्या प्रमाणपत्रांचा अहवाल कार्यालयात मागवून घ्यावा. संबंधितांकडून विभागीय मंडळाकडेही द्वितीय प्रमाणपत्राची मागणी झाल्यास नियमानुसार वेळेत कार्यवाही करण्यात यावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे–०४

प्रत माहितीस्तव :–
१ ॲड. सलीम शेख, ऑफिस नं.९५(पहिला मजला), इस्ट स्ट्रीट गॅलेरिया, २४२१, ईस्ट स्ट्रीट, कॅम्प, पुणे–४११००१.
२ कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.

क्र.नाविमं/माध्य.ब-१/ 6422
नाशिक ४२२००३
दि.१४/०२/२०२३ 20

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्यमंडळाच्या पत्रानुसार आपल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र तातडीने वितरीत करणेबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक ४२२००३